आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र.एचआय/ ६७०७
दिनांक : 20/10/2023

# शुध्दीपत्रक

**विषय :** अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेबाबत

**संदर्भ :** आरोग्य खात्याकडील दि. ०९/१०/२०२३ चे कार्यालयीन परिपत्रक

## कार्यालयीन परिपत्रक

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत अंशदायी वैद्यकीय साहाय्य योजना कार्यान्वित आहे. सदर अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका सेवक/सेविका , सेवा निवृत्त सेवक/सेविका , शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल विभागाकडील सेवक/सेविका , सेवा निवृत्त सेवक/सेविका, मा . आजी सभासद, व मा. माजी सभासद यांचे वैयक्तिक स्वखार्चाची वैद्यकीय परतावा बिले सादर केल्यानंतर सदर वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती करण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत संदर्भान्कीत कार्यालयीन परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे. सदर कार्यालयीन परिपत्रकातील मुद्दा क्र. ३ मध्ये

३. पुणे महानगरपालिका सेवक/सेविका , सेवा निवृत्त सेवक/सेविका , शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल विभागाकडील सेवक/सेविका , सेवा निवृत्त सेवक/सेविका, मा . आजी सभासद, व मा. माजी सभासद यांना त्यांच्या फक्त आई-वडिलांची नांवे अथवा फक्त सासू-सासरे यांची नावे नियमानुसार समाविष्ठ करता येतील. ज्या वर्षी आई-वडील किंवा सासू सासरे यांचे नांव समाविष्ठ असेल त्या आर्थिक वर्षासाठी आई-वडील किंवा सासू सासरे यांचीच नांवे समाविष्ठ राहतील. आई-वडील अथवा सासू सासरे यापैकी जी नांवे कार्डवर समाविष्ठ करावयाची असतील, ती नांवे तसे स्वयंघोषणापत्र भरुन दिल्यानंतर त्या पुढील आर्थिक वर्षातच समाविष्ठ करता येतील. परंतू एकदा निश्चीत केलेली नावे अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजना कार्डमध्ये नियमानुसार समाविष्ठ केल्यास त्यामध्ये चालू आर्थिक वर्षात बदल करता येणार नाही.

असे नमूद आहे. वरील मुद्दा क्र. ३ मधील काही मजकुर रद्द समजण्यात यावा. या शुध्दीपत्रान्वये मुद्दा क्र. ३ खालीलप्रमाणे लागू होईल.

३. पुणे महानगरपालिकेच्या सेविका , सेवा निवृत्त सेविका , शिक्षण मंडळ व पीएमपीएमएल विभागाकडील सेविका , सेवा निवृत्त सेविका, मा . आजी नगरसेविका, व मा. माजी नगरसेविका यांना मुलभूतरीत्या फक्त त्यांच्या आई-वडिलांची नांवे नियमानुसार अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेच्या कार्डमध्ये समाविष्ठ करता येतील. तसेच सासू-सासरे यांची नावे जर समाविष्ट करावयची असतील तर त्याआर्थिक वर्षात आई-वडिलांची नावे योजनेच्या कार्डमध्ये टाकणार नाही या आशयाचे स्वयंघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. एका आर्थिक वर्षात आई-वडील किंवा सासू-सासरे अश्या एकाच जोडीचे नाव योजना कार्डमध्ये टाकता येईल.

संदर्भान्कीत मुळ कार्यालयीन परिपत्रकातील मुद्दा क्र. १ व २ मध्ये कोणताही बदल नाही.

वरील बाबींची सर्व मा. आजी-माजी महिला सभासद, मा. अधिकारी सेविका व कर्मचारी सेविका यांनी नोंद घ्यावी.

19/10/2023
डॉ. मनिषा विनोद नाईक
सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

19/10/2023
डॉ. कल्पना बळीवंत
प्र. आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

**प्रत :** १.सर्व मा. खातेप्रमुख/मा. महापालिका सहाय्यक आयुक्त/परिमंडळे/क्षेत्रिय कार्यालये, पुणे महानगरपालिका
२. माध्यमिक शिक्षण विभाग/उच्च माध्यमिक व तंत्रशाळा, पुणे महानगरपालिका
३. प्राथमिक शिक्षण विभाग, पुणे महानगरपालिका
४. पीएमपीएमएल विभाग, पुणे महानगरपालिका

यांजकडेस माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी